**राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत गठित करण्यात आलेल्या राज्य कार्यकारी समितीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)**
**शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०१५/प्र.क्र. ५४ /आव्यप्र-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ मे, २०१८.

वाचा:- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डीएमयु-२००५/प्र.क्र.७०/डीएम-१, दि.२४.५.२००६.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डीएमयु-२००५/प्र.क्र.७७/डीएम-१, दि.१०.७.२०१७.

**प्रस्तावना:-**

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास मदत करणे, निर्धारीत केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करणे व प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर जिल्ह्याधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

नागरी संरक्षण दलाच्या प्रतिनिधींना राज्य कार्यकारी समिती आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांच्या बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

नागरी संरक्षण दलातील अतिरिक्त पोलीस महासंचालक (ADG) यांना राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीस आणि उपनियत्रंक नागरी संरक्षण/ जिल्हा समादेशक होमगार्ड यांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांच्या बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून नियुक्त करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

राज्य कार्यकारी समिती आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांच्या बैठकांना वरील अधिकाऱ्यांना नियमितपणे आमंत्रित करण्यात यावे. बैठकीस उपस्थित राहणाऱ्या वरील अधिकाऱ्यांच्या प्रवास भत्त्यासाठी होणारा खर्च नागरी संरक्षण दलामार्फत करण्यात येईल.

संदर्भात नमूद केलेल्या दोन्ही शासन निर्णयात अन्य कोणताही बदल नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्य शासानच्या www.Maharshtra.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०५१४१५३२४१४२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.05.14 15:33:23 +05'30'

**( श्रीरंग घोलप )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रती:-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
२) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई.
४) सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) विभागीय आयुक्त (सर्व) / जिल्हाधिकारी (सर्व)
७) निवडनस्ती.